शिक्षण विभाग,रायगड जिल्हा परिषद,अलिबाग
कुंटेबाग, प्रशासकीय इमारत, रायगड जिल्हा परिषद,अलिबाग, जि. रायगड पि.न - ४०२ २०१
दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२३६९ Email ID-copriraigad@gmail.com

जा.क्र. राजिप/शिक्षण/प्राथ/आस्था-३/४१९६/२०२६ दिनांक ०३/११/२०२६

वाचले:-

१. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीईटी२०१५/प्र.क्र.१४९/टिएनटी-१, दिनांक २७/०२/२००३.
२. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब, दिनांक १२/१२/२०११.
३. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीईटी२०१५/प्र.क्र.१४९/टिएनटी-१, दिनांक २३/०६/२०१७.
४. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संहनिग/२०१८/प्र.क्र.३१८/टिएनटी-१, दिनांक ०१/०१/२०१९.
५. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संहनिग/२०१८/प्र.क्र.३९०/टिएनटी-१, दिनांक ०९/०१/२०१९.
६. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संहनिग/२०१८/प्र.क्र.३९७/टिएनटी-१, दिनांक ०७/०२/२०१९.
७. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीईटी२०१५/प्र.क्र.१४९/टिएनटी-१, दिनांक ०७/०२/२०१९.
८. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३९७/टिनटी-१, दिनांक १२/०६/२०१९.
९. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक पीआई/(८६/१३)/प्राशि-५, दिनांक १९/०६/२०१३.
१०. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१०६/टिएनटी-१, दिनांक १०/११/२०२२.
११. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.५०९/टिएनटी-१, दिनांक १३/१०/२०२३.
१२. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र.क्र.२६०/टिएनटी-१, दिनांक ०७/०२/२०२३.
१३. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकर्ण-२०२३/प्र.क्र.१५१/टिएनटी-१, दिनांक ०९/०६/२०२३.
१४. शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.१७४/टिएनटी-१, दिनांक २१/०६/२०२३.
१५. सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्रमांक रा.आधो४०२४/प्र.क्र.१४/१६-अ, दिनांक २५/०१/२०२४.
१६. पवित्र प्रणली अंतर्गत प्रसिध्द करणेंत आलेली जाहिरात दिनांक ०६/०८/२०२६.
१७. मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्रमांक मरापप/पवित्र पोर्टल/पदभरती/२०२६, दिनांक २८/०८/२०२६
१८. प्रवित्र प्रणाली मार्फत शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ मधील कन्व्हेटेड राऊंडमधील उमेदवारांचे समुपदेशन दिनांक ०३/११/२०२६.
१९. कार्यालयीन मंजूर टिप्पणी दिनांक /१०/२०२६.

आदेश:-

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय, परिपत्रके, शुध्दीपत्रक व मंजूर टिप्पणी यांचे अधिन राहून शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ मधील खालील उमेदवारांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **शिक्षण सेवक (ऊर्दू माध्यम)** या पदावर रायगड जिल्हयामध्ये खालील अटी व शर्तींना अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना देणेंत येत आहे.

अ. क्र.	गुणवत्ता यादीतील अ.क्र.	नांव	मूळ प्रवर्ग	निवडीचा प्रवर्ग		पदस्थापनेची शाळा	तालुका
				प्रवर्ग	समांतर आरक्षण		
१	२	३	५	६	७	८	९
१	१	श्री. निज्मुद्दीन सिराजूद्दीन	खुला	खुला	-	माझेरी	मुरुड

अटी व शर्ती:-

१. शिक्षण सेवकांना दरमहा १६,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सोळा हजार मात्र) मानधन असून त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.
२. प्राथमिक शिक्षकांना असणा-या कोणत्याही प्रकारच्या रजा शिक्षण सेवकांना असणार नाहीत. महिला कर्मचा-याबाबत प्रसुती रजा संबंधितांना देय असून त्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय नाहीत.
३. प्रथम नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत नियुक्तीचे ठिकाणी हजर होणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत नियुक्तीचे ठिकाणी हजर न झाल्यास शिक्षण सेवक नियुक्ती रद्द समजणेंत येईल.
४. शिक्षण सेवक नियुक्ती ज्या प्रवर्गातून / समांतर आरक्षणातून करणेंत आलेली आहे, त्या संबंधी दस्ताऐवज वैध / अवैध याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे निर्णयाचे अधिन राहून करणेंत आली आहे. भविष्यात सदरील दस्ताऐवज अवैध ठरल्यास नियुक्ती आदेश रद्द करणेंत येईल.
५. ज्या उमेदवारांची निवड आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्यांचे आंत जात वैधता पडताळणी समितीकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक राहिल. जात पडताळणी समिती यांचेकडील पोहोंच (साक्षांकित प्रत) नियुक्ती प्राधिका-यास सादर करणे बंधनकारक राहिल.
६. मागासवर्गीय उमेदवारांची नियुक्ती ही जात प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून करणेंत आलेली असून त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास, त्यांना सेवेतून तात्काळ कमी करणेंत येईल, याची नोंद घ्यावी.
७. सदरील उमेदवारांना सद्यस्थितीत शासनाने लागू केलेली राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजन (NPS) लागू राहिल.

Scanned with OKEN Scanner

८. शिक्षण सेवक म्हणून झालेली नियुक्ती ही उमेदवार प्रत्यक्ष नियुक्तीचे ठिकाणी हजर झालेपासून सलग ३ वर्षे कालावधीसाठी राहिल.
९. उमेदवारांना शिक्षण सेवक म्हणून रायगड जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या कोणत्याही प्राथमिक शाळेवर काम करणे बंधनकार राहिल.
१०. नियुक्तीचे कालावधीमध्ये उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास सदरची नियुक्ती रद्द करणेंचा अधिकार निम्न स्वाक्षरीत यांना राहिल.
११. शिक्षण सेवक म्हणून हजर झालेपासून MS-CIT किंवा समकक्ष संगणक परिक्षा २ वर्षाचे कालावधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहिल.
१२. शिक्षण सेवक पदावर ३ वर्षे समाधानकारक काम केलेनंतरच उमेदवारांना प्राथमिक शिक्षकाच्या नियमित पदावर, नियमित वेतनश्रेणीत नियुक्ती देणेंस पात्र समजणेंत येईल.
१३. शिक्षण सेवकांना राजीनामा द्यावयाचा झाल्यास, त्यांनी १ महिन्याची पूर्वसूचना नियुक्ती प्राधिकारी यांना देणे बंधनकारक राहिल.
१४. शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती झालेनंतर २ महिन्यांच्या कालावधीत जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड यांचे वैद्यकीयदृष्टया पात्र असलेबाबतचे प्रमाणपत्र गट शिक्षणाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.
१५. संदर्भिय शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय किंवा अन्य सक्षम न्यायालय यांचे वेळोवेळी प्राप्त झालेले आदेश किंवा निर्देशाचे अनुषंगाने नियुक्ती बाबतचा निर्णय निम्नस्वाक्षरीत यांनी राखून ठेवलेला आहे.
१६. मा. उच्च न्यायालयातील शिक्षण सेवक पद भरतीशी संबंधित अन्य प्रलंबित असलेल्या याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून नियुक्ती आदेश देणेंत येत आहे.
१७. संबंधित उमेदवारांनी ३० दिवसांचे आंत चारित्र्य पडताळणीबाबतचा संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक / पोलिस आयुक्त यांचेकडील अहवाल गट शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा.
१८. शिक्षण सेवक पदावर हजर होतेवेळी माध्यमिक शालांत परिक्षा मराठी व हिंदी भाषा या विषयासह उत्तीर्ण नसलेस, तदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा पास होणे बंधनकारक राहिल.
१९. ज्या उमेदवारांनी इंग्रजी माध्यमातून व्यावसायिक अर्हता धारण करुन नियुक्ती घेतलेली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर शिक्षण सेवक कालावधीमध्ये त्यांची कौशल्य चाचणी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त प्रादेशिक विद्या प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या इंग्रजी भाषेशी संबंधित संस्थेकडून घेणेंत येणार आहे. सदर कौशल्य चाचणीनुसार संबंधित उमेदवारांचे कौशल्य / ज्ञान असमाधानकारक असलेचे आढळल्यास त्यांची सेवा समाप्त करणेंत येईल.
२०. नियुक्तीचे कालावधीत उमेदवारांना खालील प्रमाणे शैक्षणिक कर्तव्ये पार पाडावी लागतील.
    - उमेदवारांनी त्यांना पदस्थापना दिलेल्या शाळेत प्रवेशायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करुन घेणेंच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील पदसंख्या वाढविणेंचे दृष्टीने प्रयत्न करणे.
    - शाळेमध्ये नियमित पूर्णवेळ उपस्थित राहणे.
    - अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य शाळेमध्ये संग्रहित करणे.
    - शाळेतील नेमून दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दतीनुसार अध्यापन करणे.
    - शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी यांचे नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबीबाबत त्यांचे आदेशाचे पालन करणे.
    - वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मुल्यमापन करणे.
    - शैक्षणिक व इतर उपक्रमाच्या (क्रीडा स्पर्धा व वकृत्व स्पर्धा इ.) आयोजनामध्ये सहभागी होणे.
    - जिल्हा परिषदेने अथवा शासनाने बंधनकारक केलेल्या प्रशिक्षणास उपस्थित राहणे.
    - जिल्हा परिषदेने अथवा शासनाने सार्वजनिक हितास्तव वेळोवेळी दिलेले कामकाज पार पाडणे.

उपरोक्त अटी व शर्तींचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई वा हलगर्जीपणा केल्यास, संबंधित उमेदवारांची नियुक्ती रद्द करणेंची कार्यवाही करणेंत येईल.

(नेहा भोसले, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

प्रत:- माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.
१. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती ---------- जि. रायगड
२. मुख्याध्यापक, रा.जि.प. शाळा ---------- ता. ---------- जि. रायगड
३. संबंधितांस (रजिस्टर पोस्टाने)

Scanned with OKEN Scanner